


मूळ सफाई कामगारांनाच एसटीकडून फेरनियुक्ती

कंत्राटावर ४५० कोटी खर्च; स्वच्छतेवर भर



एसटी म... ५०२ को...



माजी शिक्षक, विद्यार्थ्यांचा सत्कार

नृत्यांगना विष्कराला उत्स्फूर्त प्रतिसाद

नेरळमध्ये सॅनिटायझरची निर्मिती

शिक्षक, कर्मचाऱ्यांना मोफत वाटप, मशिनरीसाठी पुढाकार



पालादपूरमध्ये कोरोनाबाबत मार्गदर्शन

अफवांवर विश्वास न ठेवता खबरदारी घेण्याचे आवाहन





विद्यार्थ्यांकडून शिवजयंती साजरी

मुफ्ती रफीक पुरकर यांना डॉक्टरेट पदवी

न्हावा-शेवा बंदरातील कामगार आक्रमक

उडापे गाव तहानलेले!

20 March 2020

सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश

...मुंबई, ता. १९ (बातमीदार) : केंद्र व राज्य शासनाच्या आदेशानुसार कोरोना विषाणूची लागण होऊ नये यासाठी विविध उपाययोजना राबवण्याकरिता पैसे अडकून राहू नयेत, यासाठी एक मार्च रोजी मंत्रालयामध्ये सर्व प्रकारच्या अस्थापनांना तात्पुरती मुभा बहाल करण्यात आली आहे.

याच पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून नागरिकांची गर्दी टाळण्यासाठी जकी मुंबई महानगरपालिका मुख्यालय व इतर कार्यालयांत अभ्यागतांच्या प्रवेशावर तात्पुरती बंदी आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसे आदेश महापालिका आयुक्त अजोयमेहता यांनी जारी केले आहेत. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांसाठी नागरिकांकडून दररोज मोठ्या संख्येने येणारे पत्रव्यवहार, तक्रारी, सूचना, हरकती यांसाठी ई-मेल आयडी तसेच कंत्राटदार, नगरसेवक अशा अभ्यागतांच्या मोठ्या प्रमाणावर वावर असतो. त्यामुळे पालिका प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

सर्व मुख्यालये, विभाग कार्यालये, परिमंडळीय कार्यालये, प्रमुख रुग्णालये, उपनगरीय रुग्णालये, दवाखाने, प्रसूतिगृहे, आरोग्य केंद्रे, प्रशिक्षण केंद्रे, शाळा, उद्याने, क्रीडांगणे, जलतरण तलाव, वाचनालये, सभागृहे, मंडई, स्मशानभूमी, विद्युत दाहिनी, दफनभूमी, पोलीस ठाणे, न्यायालये, आपत्कालीन सेवा, अग्निशमन दल, मलनिस्सारण प्रचालन, पर्जन्य जलवाहिनी प्रचालन, पाणीपुरवठा प्रचालन, घनकचरा व्यवस्थापन, मलनिस्सारण प्रक्रिया केंद्रे, उदवाहन (लिफ्ट) कार्यालये, पशुवैद्यकीय रुग्णालये, दवाखाने, प्राणिसंग्रहालय, पशुवैद्यकीय सेवा, पशुवैद्यकीय प्रशिक्षण केंद्र, पशुवैद्यकीय प्रयोगशाळा, पशुवैद्यकीय दवाखाने, पशुवैद्यकीय फिरते दवाखाने, पशुवैद्यकीय पांजरपोळ, कोंडवाडा, पशुवैद्यकीय रुग्णवाहिका, पशुवैद्यकीय शवविच्छेदन गृह, पशुवैद्यकीय दहनभूमी, पशुवैद्यकीय दफनभूमी, पशुवैद्यकीय औषधालये, पशुवैद्यकीय औषधी भांडार, पशुवैद्यकीय औषधी वितरण केंद्र, पशुवैद्यकीय औषधी वितरण वाहन, पशुवैद्यकीय औषधी वितरण दालन, पशुवैद्यकीय औषधी वितरण गोदाम, पशुवैद्यकीय औषधी वितरण कार्यालय

लोकमत

महाविद्यालयात तयार केले सॅनिटायझर

लोकमत न्यूज नेटवर्क

कर्जत : सध्या जगभरात एकच चर्चा सुरु आहे. कोरोना विषाणूला कसा आळा घालता येईल याची उपचार पद्धती अद्यापही तज्ज्ञांना संशोधनातून शोधून काढता आली नाही. सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. विषाणूपासून बचावण्यासाठी मास्क, सॅनिटायझर सर्वसामान्यही वापरु लागल्याने अनेक ठिकाणी तुटवडा भासू लागला आहे. यावर उपाय म्हणून कोकण ज्ञानपीठ राहुल थारकर फार्मसी महाविद्यालयातील एका प्राध्यापकाने सहकारी व विद्यार्थ्यांच्या मदतीने हर्बल हँड सॅनिटाझर तयार करून शिक्षक व कर्मचाऱ्यांना मोफत वाटप केले.



कोरोना विषाणूची भीती अगदी सर्वसामान्यांनासुद्धा आहे. हे विषाणू रोखण्यासाठी मास्क व हँड सॅनिटायझरचा सर्रास उपयोग होत असल्याने तुटवडा निर्माण झाला आहे. यावर उपाय म्हणून कोकण ज्ञानपीठ राहुल थारकर फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली अनिकेत इंदुलकर या प्राध्यापकाने सामाजिक सुरक्षा, आपुलकी, जनजागृती व बांधिलकी लक्षात घेता लॅब असिस्टंट संजय चौधरी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन हर्बल हँड सॅनिटायझर तयार केले. सॅनिटायझर तयार करताना आय सो प्रोपाइल, ग्लिसरीन, ॲलोवेरा जेल, डमेन्शियल ऑइल वापरले

Helo Raigad
Page No. 3 Mar 20, 2020
Powered by: ereego.com

लोकमत

तरुणांनी शिवाजी महाराजांचे विचार अंगीकारावे

सागर देशपांडे : कर्जतमध्ये कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कर्जत : शिवजयंतीच्या दिवशी फेटे बांधणे, ढोल ताशा, डीजेच्या संगीतावर मिरवणुका काढणे इतक्यावरच न थांबता शिवाजी महाराजांचा एक गुण जरी अंगीकारला तरी जीवनाचे सार्थक होईल. नुसत्याच जय शिवाजी, जय भवानी घोषणा देण्यापेक्षा शिवाजी महाराज आपला व्हिजनरी असला पाहिजे, महाराजांची विशेषणे आपल्या अंगी येण्याची ताकद स्वत:मध्ये निर्माण केली पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते डॉ. सागर देशपांडे



मार्गदर्शन करताना डॉ. सागर देशपांडे.

यांनी केले.

कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकतेच विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. देशपांडे यांच्या हस्ते दीप



प्रज्वलन करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे खजिनदार झुल्फकरअली डाभिया, सचिव प्रदीप शृंगारपुरे, प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे, उपप्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान आदी उपस्थित होते. डाभिया यांच्या हस्ते डॉ. देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थी प्रतिनिधी अतिश पाटील याने समारंभाची रूपरेषा सांगितली.

देशपांडे म्हणाले, एक वेळ गावात नळपाणी योजना नसली तरी चालेल परंतु गावात किती देवळे आहेत ते आपण पाहत असतो. देवळासाठी कितीतरी पैसे खर्च करतो. आपल्या महिला-भगिनी पाच पाच किलोमीटरवरून पाणी आणतात हे चालते. नुसते तयार फेटे बांधू नका, फेटे बांधायला शिका. ते एक स्किल आहे आणि हल्ली स्किलला फार महत्त्व आहे. तंत्रज्ञानामुळे सवलतींची साधने वाढली आहेत. मात्र सवलत संपत आहे. सुशिक्षित माणूस सज्ञानी, संस्कारी असेलच याची खात्री राहिली नसल्याचे त्यांनी अखेरीस नमूद केले.

कार्यक्रमानिमित्त आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. भावेश खाडे याने अफजलखान वधाच्या पोवाड्या सादर करून वातावरणनिर्मिती केली. याप्रसंगी प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Hello Raigad
Page No. 3 Feb 24, 2020
Powered by: erelego.com

लोकसत्ता

विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय
विज्ञान व तंत्रज्ञान विभाग

जिल्हा कृषीलय, नंदुरबार
ई-निविदा सूचना क्र.०८/२०२०-२१

लोकसत्ता
क्लासिफाइड्स्

पाहिजेत

WANTED
Site Supervisor

The Deccan Merchants Co-op. Bank Ltd., Mumbai
Website: www.deccanbank.com

General Manager
Qualification: Candidate should be Graduate. Preference will be given to the candidate having Post graduate/MBA (Finance)/CAIIB
Experience: Minimum 15 years of Common Manager/ Dy. General Manager level experience having worked with Co-operative Banks Not insisted Banks having knowledge of Banking system
Age: Maximum 60 years. Bank officials who have opted for VRS in Nationalised Banks/ Co-operative Banks may also apply
Remuneration: As per the pay scale of the bank

Senior Manager
Qualification and Experience: Candidate should be Graduate post graduate MBA, CA, B & GDCA or equivalent. Minimum 10 years of senior level experience having worked with Co-operative Banks Not insisted Banks.
Age limit: 35 to 50 years
Remuneration: As per the pay scale of the bank

Branch Manager
Qualification: Minimum Graduate preference will be given to the candidate having post graduation/ MBA, CAIIB & GDCA or equivalent
Experience: Minimum 5 years Branch Manager level experience having worked in Co-operative or Nationalised Bank.
Age: Upto 45 years
Remuneration: As per the pay scale of the bank

KONKAN GYANPEETH
ADMISSION 2020 - 21
KONKAN GYANPEETH COLLEGE OF ENGINEERING, KARJAT
KONKAN GYANPEETH KAKUL DHARKAR COLLEGE OF PHARMACY & RESEARCH INSTITUTE, KARJAT

BADLAPUR GAON (W)
1 BHK 145 sqft
POSSESSION MARCH 2021
(Ready to move)
Exclusive Brokers/Estate Agents For Sale of Flats
Office
9 0871 9595/8879466305
Resale PROPERTIES

KALYAN (West)
Satkar Builder Pvt. Ltd.
Sale Exe Investment Group
Building Consult India
Sale of Flats
For New Projects Nearest

NALANDA Academy provide Home Tuition offline/ online @ Rs 12 and PG MBA all boards JEE, NEET, B.E (ME, CA) 9821248485, 9987180454, 9833864868 coimbatore

ONLINE Education activity

WANTED Diploma Electrical Engineer (F), MCVT Qualified for Position in Factories/ commercial/ manufacturing unit Apply with Details E-Mail

WANTED Female Graduate Trainee Civil Engineers / Sales Executives Working on site / Office Near about Kalyan - Dhasnagar Contact - 9324699038

WANTED Female Computer Operator & Accounts Assistant Age 21 to 28 Graduate Inclusive Indian Nationality Only Thane Ghodbunder Road Kasarvadavali Near Mukund Nagar Contact

All Mechanic (F) Incharge Electrical Engineer Diploma Holder Fresh Candidate Required For A Government Reputed Company Mihan Limited

WANTED Female Graduate Trainee Civil Engineers / Sales Executives Working on site / Office Near about Kalyan - Dhasnagar Contact - 9324699038

WANTED Female Computer Operator & Accounts Assistant Age 21 to 28 Graduate Inclusive Indian Nationality Only Thane Ghodbunder Road Kasarvadavali Near Mukund Nagar Contact

All Mechanic (F) Incharge Electrical Engineer Diploma Holder Fresh Candidate Required For A Government Reputed Company Mihan Limited

वर्क फ्रॉम होम

पार्ट टाईम जॉब

व्यवसायविषयक

फायनान्स

गुंतवणूकविषयक

कर्जविषयक

रोजगार

हॉस्पिस मॉरिशस

ट्यूटर्स

जागाविषयक

मोकाट्टी नोटीस

जमीन विकणे आहे

व्यावसायिक जागा

मालमत्ताविषयक

यात्रासहल

वाहतूकविषयक

वृद्धाश्रम

बाहिरातविषयक

भविष्यविषयक

नावात बदल

पुण्यस्मरण

कुरिअर सर्व्हिस

मोबाईल जपून वापरा; आपली सुरक्षा आपल्याच हातात: ॲड. योगिनी वावर

कर्जतमध्ये 'मुलींची सुरक्षितता' विषयावर परिसंवाद



'अ बास्टर्ड पॅट्रियट' आणि 'ब्रह्मास्त्र' सर्वोत्कृष्ट एकांकिका



पोलीस दलातील भ्रष्टाचाराचे विधान परिषदेत पडसाद

सगळीकडे शासकीय यंत्रणा पुरी पडू शकत नाही, म्हणून नागरिकांनी पुढे यावे

पनवेल मोटर वाहन निरीक्षक गजानन ठोंबरे यांचे व्यक्तव्य



लोकमत

अपघातग्रस्तांना पुढे येऊन मदत केली पाहिजे- गजानन ठोंबरे

लोकमत न्यूज नेटवर्क

कर्जत : एखादा अपघात झाला तर पोलिसांचा ससेमीरा टाळण्यासाठी त्याला मदत करण्यासाठी कुणी पुढे येत नाही व वेळीच उपचार न झाल्याने त्या अपघातग्रस्ताचा मृत्यू होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने अपघात झालेल्यांना मदत करणाऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, असे निर्देश दिल्याने नागरिकांनी त्यासाठी पुढे येण्याची आवश्यकता आहे. कारण शासन यंत्रणा पुरी पडू शकत नाही. खरे तर रस्ते अपघातात मृत होणाऱ्यांची संख्या खूप आहे; परंतु त्याची दखल समाज घेत नाही, हे खेदजनक आहे अशी खंत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल येथील मोटार वाहन निरीक्षक गजानन ठोंबरे व्यक्त केली.

हृदयद्रावक चित्रफित दाखवून प्रबोधन

त्यानंतर मोटार वाहन निरीक्षक धनराज शिंदे यांनी दृकश्राव्यच्या माध्यमातून वाहतुकीचे नियम समजावून सांगितले. त्यानंतर अपघटन 'दंड' ही हृदयद्रावक छोटी चित्रफित सादर केली. ती चित्रफित बघून सर्वांचीच मने हेलावली. सुवर्णा जोशी यांनी नियम व कायदे पाळले पाहिजे. याबाबत जनजागृती झाली पाहिजे असे सांगितले.



प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल, समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूल कर्जत आणि कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ वा रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले होते. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. मोटार वाहन निरीक्षक नीलेश घोंदे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. प्राचार्य डॉ. मोहन काळे आणि अभिजीत मराठे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

Hello Raigad
Page No. 3 Jan 18, 2020
Powered by: erelego.com

15 Jan. 2020

अपघातावेळी मदतीसाठी पुढे येण्याची आवश्यकता

मोटर वाहन निरीक्षक गजानन ठोंबरे यांची अपेक्षा



कर्जत : एखादा अपघात झाला तर पोलिसांचा ससेमिरा टाळण्यासाठी त्याला मदत करण्यासाठी कुणी पुढे येत नाही व वेळीच उपचार न झाल्याने त्या अपघातग्रस्ताचा मृत्यू होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने अपघात झालेल्यांना मदत करणाऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, असे निर्देश दिल्याने नागरिकांनी त्यासाठी पुढे येण्याची आवश्यकता आहे. कारण शासन यंत्रणा पुरी पडू शकत नाही. खरेतर रस्ते अपघातात मृत होणाऱ्यांची संख्या खूप आहे. परंतु त्याची दखल समाज घेत नाही, हे खेदजनक आहे, अशी खंत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल येथील मोटर वाहन निरीक्षक गजानन ठोंबरे व्यक्त केली.

■ प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल, समर्थ मोटर ट्रेनिंग स्कूल कर्जत आणि कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ व्या रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन महाविद्यालयाच्या सेमीनार हॉल मध्ये आयोजित करण्यात आले होते. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. मोटर वाहन निरीक्षक निलेश थोटे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी नगरसेविका विशाखा जिनगरे, स्वामीनी मांजरे, मोटर वाहन निरीक्षक विवेक देवखिले, पोलीस निरीक्षक अरुण भोर, संजय गायकवाड, नीलेश मराठे आदी उपस्थित होते.प्राचार्य डॉ. मोहन काळे आणि अभिजीत यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यांनतर मोटर वाहन निरीक्षक धनराज शिंदे यांनी दृकश्राव्यच्या माध्यमातून वाहतुकीचे नियम समजावून सांगितले. त्यांनतर अपघटन 'दंड' ही छोटी चित्रफित सादर केली. ती चित्रफीत बघून सर्वांचीच मने हेलावली. त्यांनतर स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य विजय मांडे यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांनी आतापासूनच शिस्त व नियम पाळण्याची सवय केली पाहिजे. रस्ता सुरक्षा अभियान शहरासह ग्रामीण भागातही आयोजित करणे गरजेचे आहे, असे स्पष्ट केले.

■ पोलीस निरीक्षक अरुण भोर यांनी परदेशात गेल्यावर भारतीय माणूस तेथील नियम काटेकोरपणे पाळतो, परंतु भारतात परत आल्यावर पुन्हा आहे तसेच वागतो. तो त्याचा दोष नाही आपली समाज व्यवस्थाच तशी बनली आहे. म्हणूनच असे उपक्रम राबवून समाजप्रबोधन करावे लागते, असे सांगितले. सुवर्णा जोशी यांनी नियम व कायदे पाळण्यासाठी असतात. याबाबत जनजागृती झाली पाहिजे. नियम पाळा व आपल्या शरीराचे संरक्षक व्हा. खरेतर आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सूत्रसंचालन प्रा. प्रियांका बांदिवडेकर यांनी तर आभारप्रदर्शन विवेक भागवत यांनी केले.

12 March 2020

यशस्वी जीवनासाठी आत्मविश्वास महत्त्वाचा

प्राचार्य डॉ. मोहन काळे यांचा सल्ला

नेरळ, ता. ११ (वार्तहर) : आता तुम्ही पदवी घेतली आहे. सर्वच विभागात अनेक संधी आहेत. कोणतेही क्षेत्र निवडताना त्याचा पूर्ण अभ्यास करा. आत्मविश्वास असलेले क्षेत्र निवडल्यास तुमची यशाकडे वाटचाल नक्की होईल. म्हणूनच यशस्वी जीवनासाठी आत्मविश्वास महत्त्वाचा आहे, असा सल्ला कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी केले.

कोकण ज्ञानपीठ कर्जत कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये दिक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य विजय मांडे याच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ सुरू झाला. याप्रसंगी राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन काळे, संचालक डॉ. भाऊ रुपनवर, प्राचार्य डॉ. शिरीष पाटील, उपप्राचार्य रवींद्र कटके उपस्थित होते.

डॉ. पाटील यांनी अहवाल सादर केल्यानंतर पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली. मांडे यांनी, उच्च शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी बाहेर जावे लागेल म्हणून विद्यार्थिनींनी आपले संरक्षण आपणच करण्यासाठी सक्षम राहिले पाहिजे, असे सूचित केले. सूत्रसंचालन प्रा. जितेंद्र भामरे यांनी केले.



नेरळ : पदवीप्राप्त विद्यार्थिनीला प्रमाणपत्र देताना मान्यवर.

सकाळ

फार्मसी महाविद्यालयात रक्तदान

आप्पासाहेब धारकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिबिर

नेरळ, ता. १० (वार्ताहर) : कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे संस्थापक माजी उच्च शिक्षणमंत्री आप्पासाहेब धारकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे ३८ वे रक्तदान शिबिर होते. हवालदार कृष्णा वाघमारे यांच्या हस्ते आप्पासाहेब धारकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर दीप प्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी राजेश भूतकर, वसंत मोधळे, राजाभाऊ कोठारी, प्रा. प्रीतम जुवाटकर, सिंकेत मंडावळे आदी उपस्थित होते. सर्वप्रथम अजिंक्य चौधरी या विद्यार्थ्याने रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. या रक्तदान शिबिरात एकूण २८ रक्तदात्यांनी रक्तदान केले आणि २२ रक्तदात्यांना कमी हिमोग्लोबिन, उच्च रक्तदाबामुळे रक्तदान करता आले नाही. रक्तसंकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तपेढीच्या डॉ. कविता जाधव, लक्ष्मण नाईक, राहुल गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.



नेरळ : रक्तदान करताना विद्यार्थी.

रक्तदान शिबिराला संस्थेचे झुलकरनैन डाभिया, प्रदीप अंगणपुरे, फार्मसी सतीश पिंपरे यांनी उपस्थिती दर्शविली. याप्रसंगी विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

Mumbai Raigad Today
11/01/2020 Page No 7

पुस्तक इंडियन इकॉनमी का हुआ विमोचन

(राष्ट्रीय अवतार न्यूज़)

अलीगढ़(रजनी गवत)। कोरोना वायरस के प्रसार के साथ ही लगभग हर हफ्ते किसी न किसी क्षेत्र से हजारों कर्मचारियों को बिना वेतन के छुट्टी देने, नौकरियों से निकालने, वेतन में



भारी कटौती की खबरें आ रही हैं। इसी समस्या के निवारण हेतु अलीगढ कॉलेज ऑफ एजुकेशन एंड मैनेजमेंट के निदेशक प्रो० मो० मुकीम ने पाथ ऑफ इन्नोवशन, टेक्नोलॉजिकल चैंजेस इन २१ सेंचुरी इन पेंडेमिक एग नामक एक वेबिनार का आयोजन कराया। जिसका संचालक प्राचार्या डॉ० रुबीना शहनाज थी एवं सह संचालक डॉ० एहतिशाम अजीज रहे, कार्यक्रम का शुभारम्भ डॉ० नगमा इरफान (प्राचार्या, २ गर्ल्स कॉलेज, ए०एम०यू) ने किया इसमें मुख्य वक्ता प्रीतम वी० जुवाटकर ने कोरोना काल कोरोना काल में घर बैठे



तकनीक द्वारा रोजगार कमाने के बतायेकार्यक्रम के आयोजन में डॉ० सदफ जाफरी का मुख्य योगदान रहा इसका तकनीकी संचालन मो० रेहान के कुशल करों द्वारा हुआ। अंत में डॉ० एम० एच० रिजवी की पुस्तक इंडियन इकॉनमी के विमोचन से हुआ अंत में डॉ० उज्मा अहमद ने धन्यवाद ज्ञापन के साथ इसका समापन किया।

REPLY



जरूरी विद्यालयाची बेरी बचावसाठी जनहाकुती



गावाकडचा पोषण आहाराचे वाटप

विद्यार्थ्यांच्या हातात 'पेन हुक्का'

माथेरानमध्ये पालकांमध्ये चिंता; प्रशासनाचे दुर्लक्ष





फार्मसी महाविद्यालयात रक्तदान

आण्णासाहेब धारकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिबिर



दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर

विद्यार्थ्यां
रावे गावा
नाव मोठे

रवींद्र पाटील यांचे

लोकमत

फार्मसी महाविद्यालयाचा पदवीदान सोहळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क


कर्जत : कर्जतच्या कोकण ज्ञानपीठ संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील आणि राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयातील पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा संपन्न झाला. मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयांमध्ये पदवीदान सोहळा करण्याचे निर्देश दिल्याने या सोहळ्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

कोकण ज्ञानपीठच्या सेमिनार हॉलमध्ये पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून महाविद्यालयाच्या उपक्रमांचा आढावा सादर करून विद्यार्थ्यांसाठी अनेक क्षेत्र उपलब्ध आहेत. आपले करियर निवडताना त्याचा अभ्यास करून निवडावे, असा सल्ला दिला. गॅलेक्सी फार्माचे संचालक अजय खडके यांनी, हल्लीच्या युगात नुसती पदवी घेऊन फायदा नाही, पदवीनंतर विविध क्षेत्राचा सखोल अभ्यास करून निवडलेल्या क्षेत्राचे शिक्षण घेतले पाहिजे. मार्केटिंगचे क्षेत्र अतिशय चांगले आहे. मात्र, त्यासाठी संयमाची आवश्यकता असते, असे सांगितले.

जेएसडब्ल्यू स्टील कंपनीचे व्यवस्थापक विनय नेने यांनी आपल्या मनोगतात 'देशाच्या विकासात इंजिनीयर लोकांचा मोठा हातभार लागला आहे, तर फार्मसिस्टने देशातील जनतेचे आरोग्य सांभाळले आहे. पदवीचा उपयोग चांगले उद्योजक बनून तुमच्या कंपनीत रोजगार उपलब्ध करण्याचा प्रयत्न करून समाजोपयोगी काम करा, असा सल्ला दिला. त्यानंतर पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. वृषाली जांभूळकर यांनी केले. या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे खजिनदार झुलकरनैन डाभिया, सचिव प्रदीपचंद्र श्रृंगारपुरे आदी उपस्थित होते.

Hello Raigad
Page No. 3 Feb 10, 2020
Powered by: erelego.com

कोंकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी, फार्मसी महाविद्यालयाचा पदवीदान कार्यक्रम संपन्न



नवी मुंबई 'वॉकेथॉन २०२०'



अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशन अध्यक्षपदी डॉ.मयूर कल्याणी





पाटणेश्वरचा सुपूत्र संकेत म्हात्रेला जलतरण स्पर्धेत सुवर्णपदक

वेवक

हभप कृष्णा हरिभाऊ पिंगळे यांचे निधन



'पथनाट्यात सामाजिक प्रश्नांची जाण हवी'

लोअर परळ येथे भव्य चित्रकला स्पर्धा

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या नवीन शाखेचे उद्घाटन

फार्मसी महाविद्यालयातील रक्तदान शिबिरात २८ जणांकडून रक्तदान

एम एम आर डी ए
MMRDA

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

मुंबई मेट्रोरेल साठी लागणारे व्हील टायर्स व लोड व्हील टायर्स चा (Guide wheel tyres & Load wheel tyres) पुरवठा करणे

जिल्हा निवड समिती, पालघर

अनुकंपा तत्वावरील विशेष भरती मोहिम २०१९

शुद्धिपत्रक

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

(महाराष्ट्र विकासीत घटक)

ई-निविदा सूचना

Main Portal : https://mahatenders.gov.in

MHADA Portal : https://mhada.maharashtra.gov.in

लोकमत

आजचे दर (प्रति लिटर)	
पेट्रोल	डिझेल
८१.४८ रु.	७१.३१ रु.

या दरात कंपनीनिहाय फरक शक्य.

सारांश

रक्तदान शिबिर

कर्जत : कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे संस्थापक माजी उच्चशिक्षणमंत्री आप्पासाहेब धारकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे ३८४ वे रक्तदान शिबिर होते. या वेळी हवालदार कृष्णा वाघमारे, राजेश भूतकर, वसंत मोघळे, प्रा. प्रीतम जुवाटकर, निकेत मंडावळे आदी उपस्थित होते. सर्वप्रथम अजिंक्य चौधरी या विद्यार्थ्याने रक्तदान करुन रक्तदानाचा शुभारंभ केला. रक्तसंकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तपेढीच्या डॉ. कविता जाधव, लक्ष्मण नाईक, राहुल गायकवाड आदींनी केले.

जनार्दन कुलकर्णी यांचे निधन

खोपोली : येथील नगरपरिषद शिक्षण मंडळातील निवृत्त शिक्षक जनार्दन कुलकर्णी (७७) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आज सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी नगराध्यक्ष रोहिदास पाटील, सेवानिवृत्त संघटनेचे कृष्णा मोकल यांनी कुलकर्णी गुरुजी यांनी केलेल्या कार्याचा गौरव करुन श्रद्धांजली अर्पण केली.

हवामान

कमाल २९°C / किमान २१°C

सूर्योदय ७.१० वा. | सूर्यास्त ६.१६ वा.

दिवाळी झाली गोड



विहिंपतर्फे आदिवासींना फराळ

आदिवासी सेवा संघातर्फे धान्यवाटप



ग्रामप्रहर

संधिवाताच्या वेदनापासून दूर राहण्यासाठी नैसर्गिक उपचार




वोर्लीच्या थेट सरपंचाविरोधात ग्रामसभेतही अविश्वास ठराव मंजूर

९३५६ ग्रामस्थांची उपस्थिती



कर्जतच्या फार्मसी महाविद्यालयाचा आयर्लंडच्या एआयटीवरोबर सामंजस्य करार



अलिबागच्या गोशाळेत गायवासराची पूजा





सुरज गावंड

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

सुपेपुत्र विनायक कोळी



ज्योती सिंगासने

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

सुपेपुत्र रजनी पाटील



अशोक कडू

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

सुपेपुत्र रमेश कोळी



लोकमत

फार्मसी महाविद्यालयात सामंजस्य करार

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कर्जत : कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर महाविद्यालय, कर्जत आणि ॲथलोन इन्स्टिटय़ूट ऑफ टेक्नॉलॉजी (एआयटी), आयर्लंडबरोबर सामंजस्य करार स्वाक्षरी समारंभ यशस्वीरीत्या पार पडला. झूम मीटिंग प्लॅटफॉर्मवर स्वाक्षरी समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या समारंभाची सुरुवात दोन्ही संस्थांच्या परिचयानंतर झाली आणि त्यानंतर सामंजस्य करार करण्यात आला. राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय व आरआयकडून प्राचार्य डॉ.मोहन काळे, सहायक प्राध्यापिका, डिप्लोमा इन फार्मसी विभाग प्रमुख, आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ.वैशाली जाधव आणि इतर मध्यमाक मंडळ या कार्यक्रमास उपस्थित होते.

तर एआयटीकडून आयर्लंड कार्ल टुर्ले (आंतरराष्ट्रीय संबंधांचे उपसंचालक, युरोपियन युनियनचे नॉन मार्केट) ज्ञान व आरोग्य शाखा डीन डॉ.डॉन फॉलर, संचालक मेरी सिम्पसन या समारंभास उपस्थित होते.

डॉ.मोहन काळे आणि डॉ.वैशाली जाधव यांनी अभ्यास दूर, विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी शुल्कात सवलत, सहकारी संशोधन आणि विकास उपक्रम, संयुक्त संशोधन उपक्रमांची देवाणघेवाण, ज्ञान एक्स्चेंजसाठी वेबिनार, प्राध्यापकांसाठी प्रशिक्षण अशा विविध बाबींवर एआयटी संस्थेच्या टीमशी संवाद साधला. यामुळे महाविद्यालयातील मुलांना शिक्षणाचे नवे दालन उपलब्ध होणार आहे.

Hello Raigad
Page No. 3 Nov 04, 2020
Powered by erelego.com

लोकमत

काळसेकर तंत्रनिकेतन अजिंक्य

कॅरम स्पर्धेत यश : बुद्धिबळ स्पर्धेत ठाणे तंत्रनिकेतनची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

कर्जत : इंटर इंजिनीअरिंग डिप्लोमा असोसिएशनच्या वतीने कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या सहकार्याने ए वन झोनच्या इंजिनीअरिंग आणि फार्मसी डिप्लोमा महाविद्यालयाच्या बुद्धिबळ व कॅरम स्पर्धा संपन्न झाल्या, या स्पर्धेत एकूण १६ स्पर्धकांनी भाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. कॅरम स्पर्धेत ए. आर. काळसेकर तंत्रनिकेतन पनवेलने तर बुद्धिबळ स्पर्धेत शासकीय तंत्रनिकेतन ठाणे यांनी विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस हवालदार व कॅरमपटू कृष्णा वाघमारे यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले होते. या स्पर्धेत १५ महाविद्यालयातील कॅरम स्पर्धेत ५४ तर बुद्धिबळ स्पर्धेत ४२ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

कॅरम स्पर्धेसाठी राजेश भूतकर यांनी मुख्य पंच, तर सहायक पंच म्हणून प्रणव गांगल आणि सौरभ कुलकर्णी यांनी काम पाहिले. बुद्धिबळ स्पर्धेसाठी मुख्य पंच म्हणून अंकित जोशी आणि सहायक पंच म्हणून सागर वाघमारे, चैतन्य मोहिते यांनी काम पाहिले. डॉ. वैशाली जाधव, प्रा. रुचिता सुर्वे आणि प्रा. महेंद्र कामोदे यांनी सहकार्य केले.

कॅरम स्पर्धेत अंतिम सामन्यात एस. एच. जोंधळे तंत्रनिकेतन महाविद्यालय डोंबिवलीचा पराभव करून ए. आर. काळसेकर तंत्रनिकेतन महाविद्यालय पनवेल यांनी विजेतेपद पटकावले, तर बुद्धिबळ स्पर्धेत शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय ठाणे यांनी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय पेण यांचा पराभव करून अजिंक्यपद मिळविले.

Hello Raigad
Page No. 3 Jan 02, 2020
Powered by: erelego.com

सुधागडातील अंगणवाडी सेविकांना उत्कृष्ट सेवा पुरस्कार प्रदान

केलेल्या कामाची मिळाली पोचपावती



कर्जत : इंजिनिअरिंग, फार्मसी डिप्लोमा महाविद्यालयांच्या बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धा



खोपोली पालिका इमारतीला छत्रपती शिवरायांचे नाव द्या; भाजपाची मागणी

